**प्रेस नोट - ४५** **दि. २८/१०/२०२३**

# शिवाजीनगर पोलीसांनी दोन अग्निशस्त्र ताब्यात घेतलेबाबत...

दिनांक २६/१०/२०२३ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई यांना पोलीस ठाणे हद्दीत एक गावठी पिस्तूल व देशी बनावटीचे रिव्हॉल्वर असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

सदरची माहिती प्राप्त होताच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई यांनी दोन पथके तयार करून मिळालेल्या माहितीच्या आधारे घराची झडती घेतली असता एका राहत्या घरामध्ये एक गावठी पिस्तुल, एक देशी बनावटीचे रिव्हॉल्वर व दोन जिवंत काडतुसे मिळून आली. त्यानुसार शिवाजीनगर पोलीस ठाणेस कलम ३,२५ शस्त्र अधिनियम १९५९ सह ३७ (१), १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयामध्ये तपासाअंती हिना रिहान खान, वय २४ वर्षे हीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सपोनि विलास नवले करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री विनायक देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त, श्री हेमराजसिंह राजपूत, सहायक पोलीस आयुक्त, देवनार विभाग, श्री संजय डहाके यांचे मार्गदर्शनाखाली श्री अर्जुन रजाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई यांचे नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि नवले, सपोनि जाधव, पोह मगरे, मोरे, पोशि मोरे, घारे, खिलारे यांनी केलेली आहे.

---------